न्यायालयीन प्रकरण तात्काळ

क्र.युएलसी/युएलएन/६(१)/एसआर-३२३/व्दारली,
/याचिका क्रं.४५६१/२०१०
उपजिल्हाधिकारी व सक्षम प्राधिकारी,
उल्हासनगर नागरी संकुलन, ठाणे
जिल्हाधिकारी कार्यालय,
४था मजला, ठाणे.
दिनांक :30/०९/२०१०

उहन - ३
दप्तर क्र. २५८/२०११
५८/११६

प्रति,

तहसिलदार अंबरनाथ,

विषय :- नागरी जमिन (कमाल धारणा व विनियमन) अधिनियम - १९७६ चे कलम १०(१), १०(३) व १०(५) ची कार्यवाही रद्द करणेबाबत

संदर्भ :- १) मा. उच्च न्यायालय मुंबई याचिका क्रं.४५६१/२०१० मधिल आदेश दिनांक २१/०७/२०१०

वादी, अंजनेय लॅड अँड प्रॉपर्टी डेव्हलपर्स, यांनी मौजे-व्दारली, ता. अंबरनाथ, जि. ठाणे, येथिल जमिनीबाबत नागरी जमिन (कमाल धारणा व विनियमन) अधिनियम - १९७६ चे कलम १०(१) १०(३) ची कार्यवाही रद्द करणेकरीता मा. उच्च न्यायालयात रीट याचिका क्रं.४५६१/२०१० दाखल केलेली होती. सदरहू याचिकेचा निर्णय मा. उच्च न्यायालय मुंबई यांचेकडे दिनांक २१/०७/२०१० रोजी झालेला असुन या अधिनियमांतर्गत केलेली कलम १०(१) १०(३) व १०(५) ची अधिसुचना रद्द करुन त्यामध्ये नमुद असलेल्या जमिनीच्या ७/१२ भोगवटा सदरी महाराष्ट्र शासन ही नोंद रद्द करुन भोगवटा सदरी वादी/जमिनमालक श्री. वासुदेव गंगाराम चिकणघर व इतर, रा. व्दारली, यांचे नांव लावणेबाबतची रीट याचिका मान्य झालेली आहे.

सबब मा. उच्च न्यायालयाचे निर्णया नुसार व याचिका कर्ते यांची मौजे-व्दारली, ता. अंबरनाथ, येथिल स.नं. ३५/३, क्षेत्र.५३६०.०० चौ.मी. एकुण क्षेत्र.५३६०.०० चौ.मी. या जमिनीचे गांव दप्तरी ७/१२ च्या भोगवटदार सदरी महाराष्ट्र शासनाची झालेली नोंद कमी करुन, या नोंदी पूर्वीचे ७/१२ वरील मूळ मालकांची नोंद करणेत यावी व सदर नोंदीच्या सुधारीत ७/१२ उताऱ्यासह अहवाल सादर करावा.

Sdxxx
उपजिल्हाधिकारी व सक्षम प्राधिकारी,
उल्हासनगर नागरी संकुलन, ठाणे.

प्रत :- १) श्री. वासुदेव गंगाराम चिकणघर व इतर, रा. व्दारली, ता. अंबरनाथ, यांना माहितीसाठी रवाना
२) तलाठी सजा-व्दारली, ता. अंबरनाथ, यांना पुढील योग्य त्या कार्यवाहीसाठी.

उपजिल्हाधिकारी व सक्षम प्राधिकारी,
उल्हासनगर नागरी संकुलन, ठाणे.

क्र.युएलसी/युएलएन/६(१)/एस.आर-३२३/व्दारली,
उपजिल्हाधिकारी व सक्षम प्राधिकारी,
उल्हासनगर नागरी संकुलन,
जिल्हाधिकारी यांचे कार्यालय,
४था मजला,ठाणे.
दिनांक 30/०९/२०१०

प्रती,

संचालक, शासकीय मुद्रणालय,
चर्नी रोड, मुंबई- ४०० ००६

उहन - २
दस्त क्र. २५८/२०११
५५ ११८

विषय- नागरी जमीन (कमाल धारणा व विनियमन) अधिनियम १९७६
कलम १०(३) च्या अधिसूचना

श्री. वासुदेव गंगाराम चिकणकर व इतर, यांची नागरी जमीन (कमाल मर्यादा व विनियमन) अधिनियम १९७६ च्या कलम १०(३) अनुसार काढलेली अधिसूचना सोबत जोडली आहे. सदरची अधिसूचना महाराष्ट्र शासन राज्यपत्रात प्रसिध्द करुन राज्यपत्राच्या १० प्रती या कार्यालयास पाठविणेस विनंती आहे.

( बी. डी. जाधव )
उपजिल्हाधिकारी व सक्षम प्राधिकारी,
उल्हासनगर नागरी संकुलन, ठाणे

प्रत :-
तहसिलदार अंबरनाथ / तलाठी व्दारली,

२/- अधिकार अभिलेखात (गाव नमुना नं.७/१२) ला सोबतच्या अधिसुचने प्रमाणे योग्य ती हक्कनोंद घ्यावी व सुधारीत गाव नमुना नं.७/१२ ची प्रत या कार्यालयास नियोजित कार्यक्रमाप्रमाणे त्वरीत सादर करावी.

# अधिसुचना

उहल - १
२५८/२०११
५/१/१५८

क्रमांक :- युएलसी/युएलएन/६(१)/एस.आर-३२३/व्दारली,
दिनांक :-३०/०९/२०१०

उपजिल्हाधिकारी व सक्षम प्राधिकारी, उल्हासनगर नागरी संकुलन ठाणे यांजकडून, अधिसुचीत करण्यात येते की,

ज्याअर्थी, **श्री. वासुदेव गंगाराम चिकणकर व इतर, रा. व्दारली, ता. अंबरनाथ,** यांनी उल्हासनगर नागरी संकुलनातील मौजे-व्दारली, येथे धारण केलेल्या कमाल क्षेत्राबाबत नागरी जमिन (कमाल धारणा व विनियमन) अधिनियम १९७६ च्या कलम ८(४) खाली, **दिनांक २०/११/१९९०** रोजी आदेश पारीत झाले आहेत. सदर आदेशानुसार खालील नमुद क्षेत्र अतिरीक्त म्हणून घोषित करण्यांत आले आहे.

## जमिनीचा तपशिल

| गांव | तालुका | स.नं. / हि. नं. | क्षेत्र चौ.मी. |
|---|---|---|---|
| व्दारली | अंबरनाथ | ३५/३ | ५३६०.०० |
| | | **एकुण** | **५३६०.००** |

ज्याअर्थी, वरील कायद्यांतर्गत कलम १०(१), १०(३), व १०(५) अन्वये भूसंपादनाची कार्यवाही करण्यात आलेली आहे. कलम १०(३), व १०(५) च्या कार्यवाहीच्या अनुषंगाने विवरणपत्रधारक **श्री. वासुदेव गंगाराम चिकणकर व इतर,** यांचे नांवे असलेल्या भुमि अभिलेखातील ७/१२ उता-यावर कब्जेदारी व इतर हक्कात अतिरीक्त घोषित अशी नोंद घेण्यात आली आहे.

महाराष्ट्र शासनाने ना.ज.क.धा. अधिनियम १९७६ हा कायदा दि.२९/११/२००७ रोजी रद्द करुन जमिन (कमाल धारणा व विनियमन) निरसन अधिनियम १९९९ हा कायदा महाराष्ट्र राज्यासाठी अंगीकृत करण्यात आलेला आहे. निरसन अधिनियमाच्या तरतूदीनुसार अतिरिक्त जमिनीबाबत कलम १०(३) व १०(५) ची कार्यवाही करुन शासनाने दि.२९/११/२००७ पूर्वी प्रत्यक्ष ताब्यात घेतलेल्या जमिनीचे शासनाकडे सर्वार्थाने निहीत झालेल्या आहेत. व वर नमूद केल्याप्रमाणे प्रत्यक्ष ताब्यात न घेतलेल्या अतिरीक्त घोषित जमिनीची मालकी मुळ मालकाकडे राहणार आहे.

प्रस्तुत अधिसुचनेत वर नमूद केलेल्या जमिनीबाबत केवळ कलम १०(१), १०(३) व १०(५) अन्वये कार्यवाही झालेली आहे. मुळ अधिनियमानुसार १०(३) च्या कार्यवाहीनंतर उक्त जमिनीच्या अधिकार अभिलेखामध्ये जमिनीची मालकी जमिनधारकाऐवजी शासनाची दर्शविलेली आहे. परंतू उक्त क्षेत्राचा प्रत्यक्ष ताबा दि.२९/११/२००७ पूर्वी शासनाने किंवा शासनाच्या वतीने संबंधित यंत्रणेने घेतलेला नाही. म्हणून प्रस्तूत जमिनीच्या अधिकार अभिलेखामध्ये घेण्यात आलेली महाराष्ट्र शासनाच्या मालकीची नोंद प्रस्तुत अधिसुचने द्वारे रद्द करण्यात येत आहे.

सबब, सदर प्रकरणी **दिनांक १९/०५/२००६** रोजी महाराष्ट्र शासन राजपत्रात प्रसिध्द करण्यात आलेली **दिनांक १९/०५/२००६** रोजीची कलम १०(३) ची अधिसुचना रद्द करण्यांत येत आहे.

( बी. डी. जाधव )
उपजिल्हाधिकारी व सक्षम प्राधिकारी
उल्हासनगर नागरी संकुलन, ठाणे.